# नियमित दिवाणी दावा क्र.२७६/२०२१ मधील नि.६७ खालील आदेश

प्रतिवादी क्र. १४ तर्फे प्रस्तुतचा अर्ज त्यांचेविरुध्द झालेला विनाकैफियत व म्हणणे नाही हुकुम रद्द होऊन दाव्याकामी कैफियत व म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी केलेला आहे.

(२) वादी यांनी सदरचा दावा हा प्रतिवादींविरुध्द वाद मिळकतींचे सरस निरस मानाने चतुःसिमापुर्वक वाटप होवून वादींचे हिश्यांचा पृथक व अलग असा कब्जा मिळणेबाबत व दरम्यानचे तुर्तातुर्त ताकिदीबाबत दाखल केलेला आहे. या अर्जान्वये प्रतिवादी क्र. १४ ने असे कथन केले आहे की, सदरील प्रतिवादी यांना वादीचे दाव्यास कैफियत व म्हणणे देणेकरीता प्रतिवादींना लागणारी आवश्यक ती कागदपत्रे, तसेच रेव्हेन्युकडील कागदपत्रांच्या नकला व माहिती लवकर मिळु शकली नाही. प्रतिवादीने मुद्दामहून जाणूनबुजून कैफियत देणेस टाळाटाळ केली नाही. तरी प्रतिवादी नं.१४ विरुध्द झालेला विनाकैफियत व म्हणणे नाही चा हुकुम रद्द करणेचा आदेश व्हावा अशी विनंती त्यांनी सदर अर्जाद्वारे केली आहे.

(३) वादीतर्फे विद्वान विधीज्ञांनी प्रस्तुत अर्जावरच म्हणणे सादर करुन असे कथन केले आहे की, प्र.वादीचे अर्जातील कारण संयुक्तीक नाही सबब सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा. अर्ज मंजूर करणेचा झालेस प्र.वादीस हेवी कॉस्ट करावी व ती रक्कम वादीस मिळावी अशी विनंती केलेली आहे.

(४) नि.६७ वरील अर्ज, त्यापुष्ट्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र व नि.६७ चे अर्जावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे

विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी दाव्याचे कामी दि.२९.११.२०२१ रोजी हजर होऊनदेखील वेळेत कैफियत दाखल करु शकलेले नाहीत. प्रतिवादीने कथन केले की, प्रतिवादींना लागणारी आवश्यक ती कागदपत्रे, तसेच रेव्हेन्युकडील कागदपत्रांच्या नकला व माहिती लवकर मिळु शकली नसलेने प्रतिवादी वेळेत कैफियत दाखल करु शकले नाहीत. प्रस्तुत दावा हा स्थावर मालमत्तेचा असून वाटप होवून कब्जा मिळणेबाबत व निरंतर ताकिदीबाबत दाखल केला आहे. प्रस्तुत प्रकरणांत प्रतिवादींना त्यांची बाजू मांडून दाव्याकामी या प्रतिवादीची कैफियत आल्यास दाव्याचे कामकाज पुढे चालून दावा गुणदोषावर निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे, दाव्याचे स्वरुप विचारात घेता व प्रतिवादीने केलेला विलंब विचारात घेता सदर अर्ज  र.रु.३००/- इतका खर्चाच्या अटीवर मंजूर करणे न्यायोचित वाटते. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी क्र.१४ यांचा निशाणी ६७ वरील अर्ज र.रु.२००/- इतका खर्च वादींना देणेचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी तालुका विधी सेवा समिती कडे र.रु.१००/- कॉस्ट जमा करावी.

Sd/-
(श्रीमती अ. ब. सोनटक्के)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
विटा, जि.सांगली.

विटा.
दि.०८.११.२०२३.

CNR No.MHSN150014752021

रे.दि.मु.नं.२७६/२०२१
(शंकर सुतार वगैरे वि. राजेंद्र सुतार वगैरे)

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | D.S.Kadam, Jr.Clerk |
| Name of the Court | :- | Smt. A.B.Sontakke,<br>$2^{nd}$ Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 08.11.2023 |
| Order signed by P.O. on | :- | 08.11.2023 |
| Order uploaded on | :- | 08.11.2023 |